International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# डॉ. संजय लोहकरे यांच्या 'पानझडी' या कविता संग्रहातील आदिवासी पर्यावरणीय जीवन जाणिवा

**श्री. चिकाळकर सुभाष शंकर[1], प्रा. डॉ. राजेंद्र वडमारे[2]**
[1]*संशोधक विद्यार्थी,*
*पद्मश्री विखे पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय प्रवारानगर ता. राहता जि. अहिल्यानगर (अहमदनगर)*
[2]*मार्गदर्शक, मराठी विभाग प्रमुख,*
*कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कोल्हार ता. राहता जि. अहिल्यानगर (अहमदनगर)*
*Corresponding Author – श्री. चिकाळकर सुभाष शंकर*
DOI - 10.5281/zenodo.17656437

**प्रस्तावना :**

आदिवासींचा सर्वांगीण विकास हा निसर्गावर अवलंबून आहे. या विकासाबरोबरच त्यांचे सामाजिक जीवन, राजकीय जीवन, सांस्कृतिक जीवन, आर्थिक जीवन, शैक्षणिक जीवन हे निसर्गावरच आधारित आहे. त्यामुळे आदिवासी जीवनात पर्यावरणीय जीवनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. आधुनिक जगात, पर्यावरण संरक्षणाची चर्चा एक तातडीची गरज बनली आहे. मात्र, मानवाच्या इतिहासात असे आदिवासी समुदाय आहे ज्यांनी निसर्गाशी असलेले आपले नाते कधीच तोडले नाही. या आदिवासी समुदायाने त्यांची जीवनशैली, त्यांच्या चालीरीती, त्यांची श्रद्धा आणि त्यांची संस्कृती हे सर्व निसर्गाशी एकरूप झालेले आहे. त्यांची पर्यावरणीय जाणीव ही केवळ ज्ञान नाही तर ती त्यांच्या अस्तित्वाचा अविभाज्य भाग आहे. आदिवासींच्या या सखोल पर्यावरणीय जाणिवांचा आणि त्यांच्या निसर्ग-संबधित जीवनशैलीचा अभ्यास डॉ. संजय लोहकरे यांच्या काव्यातून अवतरलेला आहे. आदिवासींच्या जीवन जाणिवा त्यांच्या काव्यातून प्रकटलेल्या आहेत.

**आदिवासी आणि निसर्ग : एक अतूट नाते:**

आदिवासींच्या जीवनात निसर्ग हा केवळ एक संसाधन नाही तर तो एक जिवंत आणि पूजनीय घटक आहे. त्यांच्यासाठी जंगल म्हणजे 'देवबन', 'पवित्र' किंवा 'माय' आहे. या दृष्टीकोनातून त्यांची पर्यावरणीय जाणीव निर्माण झाली आहे. ही जाणीव केवळ 'झाडे लावणे' किंवा 'पाणी वाचवणे' यापुरती मर्यादित नसून, ती निसर्गातील प्रत्येक घटकाशी असलेला आध्यात्मिक आणि भावनिक संबंध दर्शवते. यावर संजय लोहकरे आपल्या 'वनदेव' कवितेत म्हणतात की,

"रान आमचा देव । तोची आमचा भाव ।
झाडाझाडाचं नाव । आम्हा मुखी ।
त्याचे अंगी गुण । देई शहाणपण ।
गंधफुलांचं अंगण । त्याचे दारी ।
पक्षांची ती माया । जांभळीची साया ।
करवंदीला काटे । गोड धोड ॥
फुलांची अरास । वाऱ्याचा सोसाटा ।
चालला एकटा । रानोमाळ ॥"[1] पृ. क्र. 12

आदिवासींनी निसर्गाला देव मानले आहे. निसर्ग हाच आदिवासींचा सगा सोयरा आहे. जन्मत: निसर्गात वावरणाऱ्या आदिवासींना झाडांची नावे माहिती आहेत. प्रत्येक झाडांचे गुण त्यांना माहिती आहेत त्यामुळे कोणते झाड कशासाठी उपयोगी आहे याची जाणीव आदिवासींना जन्मत: मिळालेला एक प्रकारचा ठेवा आहे. आदिवासींच्या बारकाव्याचे निरिक्षण हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही केलेले आहे. ते एका ठिकाणी म्हणतात की, "आदिवासींच्या बाबतीत सांगायचे झाले तर आदिवासी समाजाचा जंगलाशी पर्यायाने जडी-बुटीशी एक सभ्य आणि भावणिक गुंतागुंतीचा संबंध फार वर्षापासून येत आला आहे. कुठली वनस्पती कोणत्या आजारावर लागू पडते हे त्यांना चांगलेच माहीत आहे."[2] आदिवासी ज्या डोंगर, नदी, दऱ्याखोऱ्यात जीवन जगतो आहे तिथे त्याला कोणत्याही प्राण्याची भीती वाटत नाही. तो एकटा रानोमाळ हिंडतो आहे. त्याचा नेहमीचा निसर्गाशी संवाद आहे. परंतु आजच्या सद्य:स्थितीमध्ये आधुनिकीकरणाच्या आणि नावाखाली जंगल नाहीसे केले जात आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास सुरु आहे याचे परिणाम वाईट आहेत. त्यामुळे आदिवासीं समाजाकडून निसर्गाशी कशा पद्धतीचा संबंध ठेवला पाहिजे याचे अनुकरण होणे अत्यंत गरजेचे आहे.

**आदिवासींचे निसर्गातील देवत्व आणि अध्यात्म :**

आदिवासी समाजाला जे काही मिळालेले आहे त्याचे श्रय त्यांनी निसर्गाला दिलेले आहे. त्यामुळे निसर्ग हा त्यांच्यासाठी देव आहे. आदिवासी हे निसर्गाची पुजा करतात. निसर्गातील प्रत्येक गोष्टीला देवत्व बहाल करण्याची परंपरा आदिवासी समुदायांमध्ये आहे. त्यामुळे झाडे, डोंगर, नद्या, तलाव, आणि विशिष्ट प्राणी यांना ते देवता मानतात आणि त्यांची पूजा करतात. परंतु त्यांच्या डोळ्यादेखत जंगलाला आग लागली किंवा त्या जंगलाचा नायनाट होत असेल तर आदिवासींच्या मनामध्ये अगणित दु:खाचा डोंगर पेटतो आहे. याची मांडणी डॉ. संजय लोहकरे हे 'वणवा' या कवितेमध्ये करतात. ते म्हणतात,

"समोरच्या डोंगराला आग लागली
प्राणी, पक्षी, वनस्पती बेचिराख झाले
म्हणून सरकारी यंत्रणेने अग्नीशामक आणले
आग अटोक्यात आली
किमान पन्नास हजाराची जंगलसंपत्ती गेली
जंगल अधिकाऱ्यांनी चौकशी केली
शेजारच्या झोपडीतून येणाऱ्या
दीन दुबळ्या आदिवासीला विचारणा झाली
बाबा, जंगलाला आग कशी काय लागली
त्यानं मानेनच खुणावत उत्तर दिलं
तो पुढे गेला आकाशाकडं पाहिलं
हात जोडलं अन् पुटपुटला
हे निसर्गदेवा, हे नियमेश्वरा
जंगलाला लागलेली आग
सर्वांनाच दिसते रे…"[3] पृ. क्र. 24

या वरील संदर्भावरुन असे लक्षात येते की, जंगल पेटल्यानंतर या दीन दुबळ्या आदिवासींना गुन्हेगार ठरवले जाते. जंगलाला आग लागलेली दिसते परंतु आदिवासीं त्या जंगलात आदिवासींचे होणारे नुकसान कोणालाही दिसत नाही. या जंगलजळीपसून आदिवासींवर उपासमारीची वेळ येत आहे. त्यांना दैनंदिन पोट भरणेही कसे आवघड होते याची मांडणी पानझडी या कवितासंग्रहातून होते आहे.

**वृक्षपूजा :**

अनेक आदिवासी जमातींमध्ये 'वृक्षपूजा' ही एक महत्त्वाची धार्मिक विधी आहे. उदा. मुंडा, संथाळ आणि इतर जमाती 'साल' वृक्षाला पवित्र मानतात. झाडांना कुटुंबातील सदस्यांप्रमाणे आदर दिला जातो. ज्या त्या आदिवासी जमातींमध्ये संस्कृतिक रेलचेल वेगवेगळी दिसून येते. त्यामुळे प्रत्येक आदिवासी जमातीची वृक्षपूजा हे वेगवेगळी आहे. या वृक्षावरुन आपल्या मानसामानसात कसा दुभंग तयार झाला आहे हे 'पळस' या कवितेनू आढळते. त्या संदर्भात या कवितेत ते लिहितात की,

"कसा पळस फुलला
लाल गुलाबी देठानं
ऊन वारा झोंबतोया
रखरखत्या ओठानं
आंब्या महूटाची छाया
आस पास खेळतीया
त्याच्या गुलाबी देठाला
वास त्याचा झोंबतोया
शरदाच्या चांदण्यात
गीत गोड गोड गात
लाल गुलाबी फुलांनी
मोहरली कशी रात
दिस जाती दिस येती
पळसाला काळे मोती
त्याला सपान पडलं
तुटली ही नाती गोती"[4] पृ. क्र. 13

या कवितेच्या ओळीवरुन असे लक्षात येते की, निसर्गानुसार आता माणसांचे नातेगोते निर्माण झालेले आहे. उन्हाळ्यात उष्णतेच्या झळा सोसणारा पळस आणि माणूस प्रेमाच्या एका झुळकेसाठी वाऱ्यासारखा उल्हाद वाटावा असा झाला आहे. अंबा मोहरल्यानंतर त्यांचा येणारा सुंगध त्यालाच दरवळत असतो. शरद ऋतू मध्ये रात्री पडणारे आकाशातील चांदणे जणू काय रात्रीला मोहरुन टाकते आहे. अशी अवस्था आदिम माणसांच्या नात्यागोत्यात दिसून येते. परंतु पळसाला काळे मोती हे अशोभणीय असतात आणि या निसर्गातून अधुनिकीकरणाकडे वाटचाल करताना आपल्या आदिवासींच्या होणारे हाल किंवा इथल्या प्रस्थापितांना आपली हौस पुरी करताना होणारी जंगलतोड ही आदिवासींच्या पर्यावरणावरचा ऱ्हास आहे. यासाठी आदिवासींनी कितीही बंड केले तरी त्याला कोणीही जुमानत नाही ही मोठी शोकांतिका आहे.

**डोंगर आणि नद्यांचे देवत्व :**

डोंगर आणि नद्यांना अनेक आदिवासी जमातींमध्ये 'देव' मानले जाते. त्यांची उपासना केली जाते. ज्यामुळे या नैसर्गिक स्त्रोतांचे संरक्षण आपोआप होते. परंतु याचा आदिवासींना त्यांना त्याच्या बदल्यात शिक्षा मिळते. जन्मठेप होते. याची मांडणी करणारी संजय लोहकरे 'जन्मठेप' ही कविता अत्यंत महत्त्वाची आहे. ते आपल्या कवितेत लिहितात की,

"ही माणसं अन् त्यांच्या आसऱ्यानं राहणाऱ्या
सगळ्या जीवजंतूंचा
त्याच पाण्यावर पोसलेला देह
आयुष्यभर याच मातीचं इमान राखून
तिच्याशी एकनिष्ठ राहून
जल, जंगल अन् संपत्ती राखत
नाचतो गातो अन् पूजा करतो
याच धरतीची
अन् त्याच्याच सुधारणांच्या
वेगवेगळ्या पाट्या लटकतात
त्याच्याच समोर गावभर

सुधारणांच्या नावाखाली
धरणं बांधली जातात
तेव्हा तो होतो धरणग्रस्त
त्यालाच होते जन्मठेप
या मातीशी इमान राखल्याची"[5] पृ. क्र. 31/32

आतापर्यंत आदिवासींनी जल, जंगल, जमीन यांच्याशी प्रमाणिक राहून त्याचे जतन केले आहे. जेव्हा केव्हा विकासाचा प्रश्न येतो तेव्हा त्याला जंगलातून हकलून दिल्या जाते आणि त्याच्या जागेवर विकास केला जातो. या विकासाच्या नावाखाली निसर्ग संपले जात आहेत. याचे सुतक फक्त आदिवासींच आहे. तो विकासाच्या आड येतो म्हणून गाडला जातो, मारला जातो, त्यालाच जन्मठेप होते. कारण त्याने प्रमाणिकपणाने आजतागायत निसर्ग जपलेला आहे.

**पारंपरिक ज्ञान आणि शाश्वत जीवनशैली :**

आदिवासी समुदाय 'झूम शेती' (shifting cultivation) करतात. जरी या पद्धतीवर टीका होत असली तरी ती पर्यावरणाला कमीत कमी नुकसान पोहोचवणारी असते. कारण ते एकाच ठिकाणी दीर्घकाळ शेती करत नाहीत.

आदिवासींच्या पारंपरिक पर्यावरणीय जाणिवा त्यांच्या हजारो वर्षांच्या पारंपरिक ज्ञानावर आधारित आहेत. हे ज्ञान पिढ्यानपिढ्या मौखिक स्वरूपात हस्तांतरित झाले आहे. तसे असले तरी आदिवासींची जीवनशैलीचे ज्ञान आजही त्यांच्यात पहायला मिळते. यावर कवी आपल्या 'रानपण' या कवीतेत म्हणतात की,

"गायी , बकऱ्या, बैलांना चारताना
तितर, लावरी अन् सशाच्या हालचालीनं
रानगवताचा थरकाप व्हायचा
अन् दचकलेलं काळीज
ससा दिसत्तोवर नजर ठेवायचं
गवताचे तुरे, रानफुले अन् झाडाझुडपातून
माग काढीत पुढं धावताना
सापाचा सळसळ आवाज
अपशकून व्हायचा
किंवा मुंगसाचं लाल तोंड
सशाच्या मागाचा शकून सांगायचं
भादव्याच्या पावसात
गिंदोडी, चिंबोरी, बेरकडी शोधताना
बिळावर नजर रोखायची
बिळावरचा ताजा उकीर
पोटातल्या भूकेला उकरायचा
चावी, हमींद, खरपुडीसाठी
झाडाझुडपात हिंडताना, वाकताना
रानफुले वाकूल्या दाखवत
अन् कंदमुळांच्या वेलीकडे
हळूच खुणावत"[6] पृ. क्र. 14/15

आदिवासींची पारंपरिक ज्ञान घेण्याची पद्धत वेगळी होती. त्यांचे ज्ञान हे शालेय नव्हते तर जीवन जगताना येणारे अनुभव हे त्यांच्यासाठी ज्ञान संपादन करत असत. प्रत्येक प्राण्याच्या शिकारीसाठी किंवा रानावनात शिकारीसाठी गेल्यानंतर कशापद्धतीने शिकार केली पाहिजे याचे ज्ञान पहिल्या पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत होते. याचा दाखलाही रानपण या कवितेतून संजय लोहकरे यांनी दिलेला आहे. त्यामुळे आदिवासींचा पर्यावरणीय अभ्यास त्यांच्या जीवनशैलीतच कसा दडलेला आहे हे आढळते.

**वनस्पतींचे ज्ञान :**

आदिवासींना त्यांच्या परिसरातील हजारो वनस्पतींची सखोल माहिती असते. कोणत्या

वनस्पतीचा उपयोग औषध म्हणून होतो, कोणत्या वनस्पती खाण्यायोग्य आहेत आणि कोणत्या वनस्पती विषारी आहेत. याचे त्यांना अचूक ज्ञान असते. या ज्ञानाचा उपयोग ते त्यांची पारंपरिक उपचारपद्धती आणि आहारामध्ये करतात. याचीही मांडणी 'साळ' या कवितेत संजय लोहकरे यांनी केली आहे.

"धुळवफीत पेरलेली साळ
तापलेल्या मातीत उबवते
अन् मिरगाच्या पहिल्या पावसानं
आपलाच गर्भारपण फुगवते
मिरुग सरुन आडदरा लागल्या
की धांदुक नेसलेली माय
तिचं बाळंतपण करते
अन् बापाच्या संगतीनं
चिखल भरल्या खाचरात
रोपाची साळा सुरु व्हते"[7] पृ. क्र. 33

या कवितेच्या ओळीवरुन आदिवासींची शेती करण्यासाठी त्यांना कोणतेही मुर्हत पाहण्याची गरज वाटत नाही. कोणत्या पीकाची शेती केंव्हा करावी व डोंगराळ भागामध्ये कोणते फळ कधी येईल व ते खाण्यासाठी कधी योग्य आहे याचे ज्ञान त्यांना परंपरागत मिळालेले आहे. आदिवासींना जंगलामध्ये आरोग्याच्या सेवा सुविधा उपलब्ध नसतात. त्यांना प्रकारशाने निसर्गच त्यांचे आरोग्याची काळजी घेतो असे वाटते. या निसर्गाचे ज्ञान आदिवासींमध्ये पाहायला मिळते. म्हणूनच या संदर्भात डॉ. बाबासाहेब सांगून गेले आहेत की, "आदिवासी बांधवांशी संयमाने आणि आपुलकीच्या नात्याने समन्वय साधला, त्याला दादा-बाबा करुन विश्ववासात घेतले आणि त्याच्याकडून त्या वनस्पतीबद्दल इत्यंभूत माहिती घेऊन जर का आपण ते संशोधन अत्यंत सचोटीने केले, तर आपला भारत देश ह्यामध्ये उच्चकोटीचे संशोधन करु शकतो."[8] असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केले होते. म्हणजे आदिवासींना असणारे वनस्पती बद्दलचे ज्ञान किती महत्त्वाचे आहे याची कल्पना येते.

**शिकार आणि संवर्धनाचे नियम :**

आदिवासींचा मुख्य उदरनिर्वाह हा शिकारीवर अवलंबून असतो. शिकार करणे आणि त्यावर आपली भूक भागवणे चालू असते परंतु त्याला शिकार नाही मिळाली तर कधीही नाराज होऊन आत्महत्या करत नाही हे विशेष आहे. अशीच 'पारध' ही एक कविता आहे.

"बाप जातो पारधीला माय मासे झोळते
रातच्याला पोटातली भूकही चवताळते
बाय माझी कोपऱ्याला कणी- कोंडा मळताना
जिभेच्याया चोचल्याला चूल कशी हासते
भाकरीला भाजताना तव्यालाही चेव येतो
भानवशीवर टेकताना लाल फूल फुलते"[9] पृ. क्र. 71

या कवितेमधून शिकरी करणाऱ्याची शिकार कशी होते याचे चित्र उभा केलेले आहे. त्यामुळे आदिवासींच्या वाट्याला आलेला संघर्षही या कवितेतून उभा केलेला आहे. शिकार ही आदिवासींच्या जीवनाचा एक भाग असली, तरी ती अतिशय नियमबद्ध असते. ते फक्त गरजेपुरतीच शिकार करतात आणि प्राण्यांच्या प्रजननकाळात शिकार करणे टाळतात. यामुळे वन्यजीवांचे संरक्षण होते. हे आदिवासी जीवनातील महत्त्वाचे विशेष मानले पाहिजे. आदिवासींना आतापर्यंत कधीही आणि कोणत्याही वस्तूचे संचित कलेले आढळत नाही. त्यांनी गरजेपुरतेच निसर्गातील वस्तूचे संचित केलेले आहे. त्यामुळे आदिवासी आजही त्याच्या रोजच्या गरजावरच अवलंबून आहे.

उपरोक्त विषयाला अनुसरून मांडतना आदिवासींचे जीवन जाणिवा आणि पर्यावरणाती आदिवासींचे चित्रण करणारा पानझडी हा कविता संग्रह आहे. आदिवासींच्या पर्यावरणीय जाणिवा आपल्याला एक महत्त्वाचा धडा देतात. पर्यावरण संरक्षणासाठी केवळ तंत्रज्ञानावर अवलंबून राहण्याऐवजी, निसर्गाशी असलेले आपले भावनिक आणि आध्यात्मिक नाते पुन्हा जोडणे आवश्यक आहे. आदिवासींच्या या ज्ञानाचा आदर करणे, त्यांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आणि त्यांच्यासोबत मिळून पर्यावरण संवर्धनासाठी काम करणे ही काळाची गरज आहे. त्यांची संस्कृती ही केवळ त्यांची ओळख नसून, ती संपूर्ण मानवतेसाठी एक मार्गदर्शक तत्वज्ञान आहे. या कवितेतून समस्त आदिवासी समाजाच्या जीवनाची व्यथा संजय लोहकरे यांनी मांडलेली आहे.

**निष्कर्ष :**

1. आधुनिक जगाच्या वाढत्या गरजांमुळे आदिवासींच्या या पारंपरिक जाणिवांवर मोठे संकट आले आहे. जंगलतोड, औद्योगिकीकरण, खाणकाम आणि शहरीकरणामुळे त्यांचे नैसर्गिक अधिवास धोक्यात आले आहेत.
2. जमीन आणि आदिवासींची उपजीविका विकासाच्या नावाखाली आदिवासींना त्यांच्या जमिनीतून विस्थापित केले जाते. यामुळे त्यांचे निसर्गाशी असलेले नाते तुटते आणि त्यांची पारंपरिक जीवनशैली धोक्यात येते.
3. आदिवासींचा सांस्कृतिक संघर्ष, आधुनिक शिक्षण आणि जीवनशैलीच्या प्रभावामुळे तरुण पिढी त्यांच्या पारंपरिक ज्ञानापासून दुरावत आहे.

**संदर्भग्रंथ यादी :**


1. लोहकरे संजय, पानझडी, अक्षता प्रकाशन,पुणे. प्रथम आवृत्ती 7 मे 2011
2. गंधे दिवाकर संपा लोकराज्य आदिवासी विशेषांक 1 मे 1988
3. उनि, लोहकरे संजय, पानझडी
4. उनि, लोहकरे संजय, पानझडी
5. उनि, लोहकरे संजय, पानझडी
6. उनि, लोहकरे संजय, पानझडी
7. उनि, लोहकरे संजय, पानझडी
8. गंधे दिवाकर संपा लोकराज्य आदिवासी विशेषांक 1 मे 1988
9. उनि, लोहकरे संजय, पानझडी